# नाशिक स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची 12वी बैठक अध्यक्ष सीताराम कुंटे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली

सदर बैठकीमध्ये नगरसेवक श्री सतीश सोनवणे मा. सभागृह नेता मनपा यांची संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

बैठकीत मंजूर करण्यात आलेले विषय खालीलप्रमाणे.

· कमांड कंट्रोल सेंटर ,इंटिग्रेटेड ट्राफिक मॅनेजमेंट सिस्टिम साठी महाआयटी कडे प्रस्तावातील मंजूर रक्कम टप्प्याटप्प्याने देण्याचा निर्णय घेण्यात आला

· नाशिक स्मार्ट सिटी च्या कार्यालयाचे विस्तारीकरण करण्यास मान्यता देण्यात आली.

· स्मार्ट रोडच्या मुदतवाढीचा प्रस्ताव संबंधित कंत्राटदाराला विरुद्ध करावयाच्या दंडात्मक कारवाईसह मान्यता मिळाली तसेच तांत्रिक कारणामुळे काही बाबींमध्ये झालेल्या वाढीव किंमतीस मान्यता देण्यात आली आहे.

· स्मार्ट सिटी अंतर्गत करण्यात येणाऱ्या प्रकल्पासाठी गुणवत्ता तपासणी व प्रमाणीकरणाच्या दृष्टीने त्रयस्थ संस्था नेमणूक करण्याबाबत तत्वतः मान्यता देण्यात यावी.

· (ग्रीन फिल्ड) हरित विकास परियोजना शेतकऱ्यांशी चर्चा करून अंतिम निर्णय महासभेत ठेवण्यात येणार आहे.

· पब्लिक इलेक्ट्रिक बाइसिकल प्रकल्प सुरुवातीला स्टेशनवर 25 सायकली उपलब्ध करून देणार आहे सायकलचा वेग ताशी 25 किलोमीटर असून टप्प्याटप्प्याने संपूर्ण शहरात इलेक्ट्रिक सायकलचा विस्तार करण्यात येणार आहे.

· स्मार्ट वॉटर मॅनेजमेंट प्रोजेक्ट (स्कॅडा इंटिग्रेशन ) पम्पिंग स्टेशन पासून जलकुंभात पर्यंत स्काडा प्रणाली अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आली असून सदर निविदा प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

· अहिल्याबाई होळकर पूलास लागून स्वयंचलित मेकॅनिकल यांत्रिकी दरवाजे (आटो मेकॅनिकल गेट)च्या मूळ प्रस्तावात बदल करून पुलाच्या खालच्या बाजूस सदरचा प्रकल्प उभारण्यास वाढीव किमतीसह मान्यता देण्यात आली आहे

· स्मार्ट सिटी प्रकल्प अंतर्गत बोलविण्यात आलेल्या खालील निविदांना मंजुरी देण्यात आली आहे.

1. मेकॅनिकल गेट 22.04 कोटी रुपये

2. पंडित पलुस्कर सभागृहाचे नूतनीकरण 2.54 कोटी रुपये

3. गोदावरी नदी पात्रातील गाळ काढणे व इतर संलग्न बाबी ,Trash skimmer मदतीने नदीपात्रातील पानवेली वनस्पती इतर कचरा गोळा करून नदी पात्राची स्वच्छता करणे. 2.62 कोटी रुपये

4. ABD क्षेत्रातील रस्ते पाणीपुरवठा मलनिस्सारण उपाययोजना याबाबत निवेदन तत्वतः मान्यता देण्यात आली असून 200.03 कोटी रुपये

5. गोदावरी नदीचे सौंदर्यीकरण करणे. 62.49 कोटी रुपये

6. गोदावरी नदीकाठी लगतच्या. मलनिस्सारण कामांना तत्वतः मंजुरी देण्यात आलेली आहे. 8.15 कोटी रुपयेसदर निविदा मंजूर करण्याचा अधिकार आयुक्तांना देण्यात आलेला आहे.